70586 47115, 87669 34310 ecc.tcan@gmail.com www.pawshadows.com



| पॉशॅडोज्<br>टॅरो कार्ड रीडिंग कोर्सचा अभ्यासक्रम | |
|---|---|
| **Section No.** | **Section Name** |
| Section 1 | टॅरो कार्ड्सची ओळख, टॅरोचा इतिहास, 'फूल'ची कथा |
| Section 2 | मेजर अर्काना - 22 कार्ड्स सुलट व उलट अर्थ |
| Section 3 | मायनर अर्काना - 'वॉण्ड्स सूट' (Wands suit) - 14 कार्ड्स सुलट व उलट अर्थ |
| Section 4 | मायनर अर्काना - 'कप्स सूट' (Cups suit) - 14 कार्ड्स सुलट व उलट अर्थ |
| Section 5 | मायनर अर्काना - 'स्वोर्ड्स् सूट' (Swords suit) - 14 कार्ड्स सुलट व उलट अर्थ |
| Section 6 | मायनर अर्काना - 'पेंटॅकल्स सूट' (Pentacles suit) - 14 कार्ड्स सुलट व उलट अर्थ |
| Section 7 | टॅरो कार्ड्समधील सिंबॉल्स व त्यांचे अर्थ |
| Section 8 | टॅरो कार्ड रीडिंगची तयारी - कार्ड्सचे क्लिंजिंग व चार्जिंग, प्रश्नांची मांडणी करणे |
| Section 9 | टॅरो रीडिंग प्रोसेस - इंटेन्शन सेट करणे, स्प्रेड निवडणे, कार्ड्स काढणे, कार्ड व प्रश्न यांची सांगड घालत रीडिंग करणे व त्याला एका कथासूत्रात मांडून सादर करणे |
| Section 10 | स्प्रेड्सचे विविध प्रकार - सिंगल कार्ड, दोन कार्ड्स, तीन कार्ड्स, चार कार्ड्स, पाच कार्ड्स, केलटिक स्प्रेड , हेल्थ रीडिंग आणि चक्र स्कॅन स्प्रेड, कालावधी मार्गदर्शन, दिशा सूचक स्प्रेड, स्वभाव व व्यक्तिमत्त्व दर्शक रीडिंग , कस्टमाईज स्प्रेड तयार करणे |
| Section 11 | विविध टॅरो कार्ड्सद्वारे मॅनिफेस्टेशन रेमेडी |

## मनातील काही कॉमन प्रश्नांची उत्तरे (FAQ)

**1. आपला कोर्स कोणत्या भाषेत आहे?**

उत्तर- कोर्स मटेरियल इंग्लिश आणि मराठीत असून लाईव्ह क्लासमधे शिकवण्याचं माध्यम मराठी आहे.

**2. कोर्सचे स्वरूप आणि शेड्यूल कसे असेल?**

उत्तर - दर शनिवारी सकाळी 11:00 ते 1:00 व 2:00 ते 5:00 (ist) असा एकूण पाच तासांचा लाईव्ह क्लास झूमवर घेतला जातो. असे आठ शनिवार क्लासचा कालावधी असणार आहे. सर्व 78 कार्ड्सचे अर्थ त्यातील नंबर्स व सिंबॉल सह शिकणे, प्रश्न तयार करणे, स्प्रेड निवडणे, डेकचे क्लिंजिंग - चार्जिंग - प्रोग्रामिंग करणे, रीडिंग घेणे, प्रोफेशनल टॅरो कार्ड रीडर म्हणून काम करण्यासाठी टिप्स इ. सर्व आपल्या या कोर्समध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे आपला कोर्स हा विस्तृत व व्यापक आहे.

70586 47115, 87669 34310 ecc.tcan@gmail.com www.pawshadows.com



**3. कोर्स मटेरियल मधे काय काय आहे?**

उत्तर- आपल्या कोर्स मटेरियल साठी स्वतंत्र लर्निंग मॉड्युल(वेबसाईट) आहे. ज्यामध्ये सर्व धडे इंग्लिश व मराठी मधे उपलब्ध आहेत. याचा ॲक्सेस तुम्हाला कायमस्वरूपी मिळणार आहे. त्यामुळे ते तुम्ही कधीही, कुठेही वाचू शकता.

**4. टॅरो डेक तुम्ही देणार का?**

उत्तर- या कोर्समध्ये रायडर वेट डेक (Rider Waite Deck) आपण शिकणार आहोत. या डेकची अमेझॉन लिंक शेअर केली जाईल. तो तुम्ही मागवायचा आहे. हा डेक सर्वमान्य असून मूळ डेक मानला जातो.

**5. एंजल कार्ड्स आणि टॅरो कार्ड्समध्ये काय फरक आहे?**

उत्तर- एंजल कार्ड्स डेक हा टॅरो कार्ड्स डेक पेक्षा वेगळा आहे. एंजल डेकमधे तीन प्रकारची कार्ड्स समाविष्ट असतात. yes/no प्रकारचे प्रश्न, वेळेसंदर्भातले प्रश्न व एंजल गायडन्स अशा तीन प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे असणारा एंजल डेक असतो. तुम्ही ज्या प्रकारचे प्रश्न विचाराल, त्याप्रमाणे डेकमधील कार्ड काढून त्यावर लिहिलेले उत्तर आपण बघू शकतो. प्रत्येक कार्डवर संक्षिप्त उत्तर लिहिलेले असते व सोबत दिलेल्या पुस्तिकेत त्याचे स्पष्टीकरण दिलेले असते. परंतु रायडर वेट टॅरो डेक मधे प्रश्नाच्या अनुषंगाने deep insights मिळायला मदत होते. त्यामुळे टॅरो डेक तपशीलवार शिकणे गरजेचे असते. टॅरो डेकमधे प्रत्येक कार्डला असणाऱ्या युनिक अर्थासह आपल्याला प्रश्नाच्या अनुषंगाने सखोल व व्यापक मार्गदर्शन मिळते. बाजारात अनेक प्रकारचे टॅरो डेक उपलब्ध आहेत. त्यातील काही डेकवर अर्थ लिहिलेले असतात. रायडर टॅरो डेकवर असलेल्या नंबर व चित्रांना विशिष्ट अर्थ असतात तसेच ते पृथ्वी, जल, अग्नी, वायू या तत्वांवर आधारित असल्यामुळे ते मानवी मनाशी छान जुळलेले असतात. त्यामुळेच रायडर वेट टॅरो डेक शिकणे व त्यामार्फत रीडिंग करणे ही एक सुंदर अनुभूती असते.

**6. आकाशिक रेकॉर्ड रीडिंग आणि टॅरो रीडिंग मधे काय फरक आहे?**

उत्तर- आकाशिकचा वेगळा डेक मिळतो. त्यामध्ये मुख्यतः या जन्मातले soul purpose, भविष्याबाबत मार्गदर्शन या गोष्टीसंदर्भात माहिती मिळू शकते. आकाशिक डेकमध्ये सुद्धा टॅरो प्रमाणे पंचमहाभूतांमधील चार तत्त्वांचा समावेश आहे, परंतु टॅरो कार्ड्स त्यापेक्षाही सखोल insights देतात. आकाशिक डेक शिकण्यासाठी टॅरो डेक आधी छान समजून घेणे recommended आहे.

**7. आम्हाला तुमच्या कोर्समधील टॉपिक्स सांगाल का? कोर्समध्ये काय समाविष्ट असेल?**

उत्तर- कोर्स कंटेंट साठी वर दिलेला आपल्या अभ्यासक्रमाचा चार्ट रेफर करावा.

70586 47115, 87669 34310 ecc.tcan@gmail.com www.pawshadows.com



**8. कोर्स पूर्ण केल्यावर आम्ही लगेच रिडींग करू शकतो का?**

उत्तर- कार्ड्स शिकल्यावर तुम्ही रिडींग घ्यायला सुरुवात करू शकता. आपण त्याबाबतचे सगळे मार्गदर्शन क्लासमध्ये करणार आहोत व लाईव्ह केस घेत वेगवेगळे स्प्रेड शिकून तुम्ही लगेचच रीडिंग घेऊ शकता.

**9. टॅरो आणि ज्योतिष शास्त्र यात काय फरक आहे?**

उत्तर- या दोन्ही मोडॅलिटी पूर्णपणे भिन्न आहेत. टॅरो हे भविष्य कथनाचे साधन नाही. टॅरोच्या माध्यमातून भविष्याची आखणी करणे, भविष्याबाबत अंदाज मिळवणे, त्यासाठी ब्रह्मांडाचे मार्गदर्शन मिळवणे शक्य होते.

**10. या कोर्समधे आपण अंकशास्त्र (न्यूमरॉलॉजी) पण शिकणार आहोत का?**

उत्तर- नाही, न्यूमरॉलॉजी हे पूर्णपणे वेगळे तंत्र आहे. परंतु टॅरो कार्ड वर असणाऱ्या नंबर्सचा रीडिंगमध्ये कसा उपयोग होतो ते आपण शिकणार आहोत.

**11. कोर्स पूर्ण झाल्यावर प्रॅक्टिस करताना काही अडले तर मार्गदर्शन मिळेल का?**

उत्तर- होय. क्लासचा WhatsApp support group आहे. ज्याद्वारे प्रॅक्टिस, शंकानिरसन, मार्गदर्शन कायमस्वरूपी मिळत राहील.

**12. कोर्ससाठी काही वयोमर्यादा आहे का?**

उत्तर- आम्ही असे रेकमेंड करू की वयाची 18 वर्षे पूर्ण झालेली असावी. या वयात वयाच्या अनुषंगाने येणाऱ्या maturity मुळे विषय समजणे सोपे जाते.

**13. हा कोर्स करण्यासाठी काही पूर्वतयारी / पार्श्वभूमी (eligibility) आवश्यक आहे का?**

उत्तर- अजिबात नाही. या कोर्ससाठी कोणत्याही पूर्वतयारीची आवश्यकता नाही अथवा यासाठी कोणताही eligibility criteria नाही.

**14. फी भरण्यासाठी instalment चा पर्याय उपलब्ध आहे का?**

उत्तर- होय परंतु, बॅच सुरू होण्यापूर्वी एक आठवडा आधी पूर्ण फी येणे आवश्यक आहे.

70586 47115, 87669 34310 ecc.tcan@gmail.com www.pawshadows.com



**15. पर्सनल मेंटरिंगचा पर्याय उपलब्ध आहे का?**

उत्तर- नाही, केवळ ग्रुप बॅचच घेतली जाणार आहे

**16. हा कोर्स बेसिक आहे की ऍडव्हान्स?**

उत्तर- हा कोर्स बेसिक + ऍडव्हान्स असा व्यापक कोर्स आहे.

**17. एखादा लाईव्ह क्लास बुडला तर रेकॉर्डिंग मिळेल का?**

उत्तर- आपल्या प्रत्येक लाईव्ह सेशनचं रेकॉर्डिंग सहा दिवसांच्या ॲक्सेससह सर्व सहभागींना पाठवलं जातं, पुढच्या लाईव्ह सेशनपूर्वी तो भाग पाहून पूर्ण करणे आवश्यक आहे. आपले सेशन्स interactive असल्याने शक्यतो लाईव्ह क्लास चुकवू नये.

**18. कोर्स पूर्ण झाल्यावर सर्टिफिकेट मिळेल का?**

उत्तर- होय, कोर्स पूर्ण झाल्यावर completion certificate कुरिअरने पाठवले जाते.

**19. माणसांव्यतिरिक्त प्राणी, झाडे, वास्तू यांच्यासाठी टॅरोच्या माध्यमातून रिडींग घेऊ शकतो का? व हे** या कोर्समधे शिकवलं जाणार आहे का?

उत्तर- टॅरो आपल्या मानवी जीवनाच्या सर्व भौतिक बाबी जसे की नातेसंबंध, संपत्ती, आरोग्य, करिअर, शिक्षण, जॉब, व्यवसाय, वास्तू इ. सर्वच विषयांवर उपयोगी असल्याने आपण सर्व गोष्टी विस्तृत स्वरूपात शिकणार आहोत. या बरोबरच हे तंत्र आपण प्राणी, झाडे, वास्तू कम्युनिकेशन मध्ये सुद्धा कसे वापरू शकतो हे आपल्या कोर्समध्ये शिकणार आहोत.

**20. तुमच्या पॉशॅडोजचा टेलिपथिक ॲनिमल अँड नेचर कम्युनिकेशनचा जो कोर्स आहे त्या टेलिपथिक कम्युनिकेशन मध्ये टॅरोचा उपयोग होतो का?**

उत्तर- होय, टेलिपॅथी द्वारे प्राणी, झाडे, वास्तू यांच्याशी होणाऱ्या संवादात जर काही गोष्टींबाबत पुरेशी स्पष्टता मिळत नसेल, तर टॅरो कार्ड्सच्या माध्यमातून ही स्पष्टता मिळवणे शक्य होते. तसेच प्राण्यांचे स्वभाव, आरोग्य, एनर्जी, मेंटल स्टेट कळणे सोपे जाते. कार्ड्समधील सिम्बॉल्स, नंबर, यावरून हरवलेले प्राणी, व्यक्ती, वस्तू यांच्यासाठी दिशा, अंतर इ. बाबत मार्गदर्शन मिळू शकते.

------*.*.*.*.*-----